महाराष्ट्र शासन

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, परभणी

महाराणा प्रताप चौक , जिंतूर नाका, परभणी .

जा.क्र.जिशिवप्रसं परभणी / आस्था / जि.शि.प.उ.कार्यशाळा_/२०२६/ 530 **दिनांक - 14/08/2026**

प्रति,

गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती सर्व, जिल्हा परभणी .

विषय :- जिल्हास्तरीय शिक्षण परिषद ऑफलाईन उद्बोधन कार्यशाळेसाठी प्रती केंद्र २ तज्ञ सुलभक शिक्षक (भाषा मराठी व गणित,) व एक साधन व्यक्ती यांनी उपस्थित राहणे बाबत.

उपरोक्त विषयांन्वये व संदर्भानुसार आपणास कळविण्यात येते की राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० नुसार व प्राथमिक स्तरावर २०२६-२७ पर्यंत पायाभूत भाषिक व गणितीय कौशल्य प्राप्त करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. व हा प्रत्येक बालकाचा हक्क आहे. त्यातील प्राथमिक शाळामध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान साध्य करणे ही शिक्षण व्यवस्थेची सर्वोच्च प्राथमिकता असेल ही अगदी प्राथमिक आवश्यकता आहे सूचित करण्यात आले आहे. हा हेतू केंद्रस्थानी ठेऊन प्रभावी शिक्षण परिषदेच्या माध्यमातून निपुण महाराष्ट्र अभियान अंतर्गत मिशन निपुण परभणी हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तसेच अध्ययन निष्पत्ती आधारित वर्गप्रक्रिया प्रभावी करून प्रत्येक मुलापर्यंत पोहचण्यासाठी व गुणवत्ता वृद्धी करण्यासाठी शिक्षण परिषद संदर्भात ऑफलाईन जिल्हास्तरीय उद्बोधन कार्यशाळा जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, परभणी व शिक्षण विभाग जिल्हा परिषद परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी 10 वाजता ऑफलाईन पद्धतीने जिजाऊ ज्ञानतीर्थ पाथरी रोड ,ता.परभणी या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे.

तरी जिल्हास्तरीय शिक्षण परिषद ऑफलाईन उद्बोधन कार्यशाळेसाठी प्रती केंद्र २ तज्ञ सुलभक शिक्षक (भाषा मराठी- १ व गणित -१) व एक साधन व्यक्ती यांना उपस्थित होण्यासाठी आदेशित करावे.

टीप - १) सर्वांनी वेळेवर उपस्थित राहावे.

तालुकास्तरीय शिक्षण परिषद २० ऑगस्ट २०२६ गुरुवार रोजी आयोजित करण्यात यावी.

प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, परभणी.

प्रतिलिपी :-

१. मा.मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, परभणी यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. शिक्षणाधिकारी (प्राथ. व माध्य. योजना) जिल्हा परिषद, परभणी यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव.

३. गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती सर्व, परभणी यांना कार्यवाहीस्तव.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, परभणी व शिक्षण विभाग जिल्हा परिषद परभणी

जिल्हास्तरीय उद्‌बोधन कार्यशाळा

दिनांक- १८ जुलै २०२६ रोजी वेळ सकाळी 10 वाजता.

शिक्षण परिषदेसाठी विषय

अ,क्र.	महत्वाचे मुद्‌दे	कार्यशाळा विषय / घटक	सुलभक	वेळ
१	प्रस्तावना	**शिक्षण परिषदेची रूपरेषा व विषयाची थोडक्यात ओळख**	गणेश शिंदे वरिष्ठ अधिव्याख्याता,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, परभणी	५ मिनिट
२	राज्य / जिल्ह्याचे विषय	**मित्र उपक्रमा अंतर्गत साधना वर्ग राबविणे बाबत. (विपश्यना मार्गदर्शन)**	श्री परशुराम मोरे (सहाय्यक आचार्य विपश्यना केंद्र नांदेड)	१८० मिनिट
		मध्यंतर –भोजन अवकाश		
३	सत्र-१ मागील महिन्याचा आढावा	**मागील महिन्यात वर्गात काय झाले ? कोणत्या अडचणी आल्या, कोणत्या लक्षणीय / उल्लेखनीय गोष्टी दिसल्या याचे पुनरावलोकन (अध्ययन निष्पत्ती, वर्गप्रक्रिया अनभव, निपुण भाषा व गणित कृतिकार्यक्रम**,स्पर्धा परीक्षा **व इतर उपक्रम)**	श्री संजय ससाणे (शिक्षणाधिकारी योजना)	४५ मिनिट
४	सत्र-३ -आशयाच्या आधारे पाठांचे मासिक नियोजन	**अध्ययन निष्पत्ती आधारित मासिक नियोजन ऑगष्ट महिना.**	श्री शशिकांत बिराजदार (जिल्हा परिषद शाळा खरपी तांडा)	३० मिनिट
५	सत्र-३ आशयाच्या आधारे पाठांचे मासिक नियोजन.	**अध्ययन निष्पत्ती आधारित मासिक नियोजन वर्ग प्रक्रिया डेमो. (TPD, (भाषा / गणित)**	श्री अवधूत गिरी (जिल्हा परिषद शाळा शिरोरी केंद्र शीर्षी तालुका सोनपेठ),	३० मिनिट
६	सत्र-५ राज्य / जिल्ह्याचे विषय	**१.जिल्हा PGI.**	श्री सुदर्शन चिटकुलवार (प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, परभणी),	३० मिनिटे
७	राज्य / जिल्ह्याचे विषय	**२. डॉ. जयंत नारळीकर अध्ययन समृद्धी कार्यक्रम, इन्स्पायर आवार्ड** मानक विद्यार्थी नोंदणी, AI साथी नोंदणी व कोर्स पूर्ण करणे बाबत	श्री गणेश शिंदे (वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, परभणी) प्रवीण शिंदे खान अकॅडेमी	३० मिनिट

(श्री सुदर्शन चिटकुलवार)
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, परभणी.